# महिलांची शिक्षणाप्रति जागृती, विद्यार्थ्यांची प्रगती!

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात असलेल्या रामहिंगणी गावची लोकसंख्या साधारणपणे १२००च्या आसपास आहे. या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामहिंगणी इयत्ता ४थी पर्यंत असून सध्या या शाळेत २ शिक्षक आहेत. या शाळेची पटसंख्या ५१ आहे. बहुतांश विद्यार्थ्यांचे पालक हे शेतकरी व मजूर या वर्गातले आहेत.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. परमेश्वर काळे हे या शाळेत सन २०१८ मध्ये रुजू झाले. शाळेसमोर तेव्हा **भौतिक सुविधांचा अभाव व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा खालवलेला स्तर ही दोन प्रमुख आव्हाने** होती. ही आव्हाने दूर करण्यासाठी त्यांनी गावातील समाज आणि शाळा यांच्यामध्ये असलेली दरी मिटवण्यासाठी प्रयत्न सुरु केले. शिक्षण हक्क कायदा (RTE), २००९च्या कलम २१नुसार प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती (SMC) अस्तित्वात असणे गरजेचे झाले होते. परंतु येथील SMC च्या सदस्यांना शाळेच्या विकासात SMC ची जबाबदारी व कर्तव्ये काय आहेत याबद्दल काहीच माहिती नव्हती. मुख्याध्यापक हे SMC चे सदस्य - सचिव असतात. त्या नात्याने श्री.काळे सर यांनी प्रत्येक मासिक SMC बैठकांमधून सदस्यांना सक्षम करण्याचे काम केले. शाळेबद्दल गावांतील लोकांमध्ये विश्वास निर्माण होण्यासाठी SMC दुवा म्हणून कार्य करू लागली. सुरुवातीला शाळेच्या आसपास भरपूर प्रमाणात अस्वच्छता होती, शाळेला कुंपण नव्हते, विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहे नव्हती, खेळाचे मैदान खराब होते. मग अशा भौतिक सुविधांची काळजी SMC च्या माध्यमातून घेतली जाऊ लागली.

वास्तविक शाळा व्यवस्थापन समितीमध्ये महिलांचे प्रमाण ५०% आहे. तरीही बैठकीसाठी महिलांची उपस्थिती नगण्य असायची. शाळेच्या इतर कार्यक्रमांमध्येही त्यांचा सहभाग यथातथाच होता. हे चित्र बदलण्यासाठी SMCचे अध्यक्ष आणि शिक्षकांनी पुढाकार घेतला. महिलांची शाळेप्रति असलेली भूमिका व कर्तव्य यासंबंधित जाणीव वाढवण्यासाठी कार्य केले.



मूल फक्त शाळेत शिकत नाही तर ते समाजात सुद्धा शिकत असते. 'कुटुंब' हे मुलाच्या शिकण्याचे पहिले प्रमुख केंद्र असते. कुटुंबातील मुलाजवळची सर्वात जवळची व्यक्ती आई किंवा आजी या असतात. म्हणून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा खालवलेला स्तर भरून काढण्यासाठी महिलांची खूप महत्त्वाची भूमिका आहे. शिक्षकांनी या गोष्टी शैक्षणिक पालक सभेच्या माध्यमातून समजावून सांगण्यास सुरुवात केली. शिक्षक वर्गामध्ये मुलांना कशाप्रकारे शिकवतात हे समजून घेणे, मुलांना अभ्यासगटात अभ्यासाला बसविणे, त्यांची बैठक क्षमता वाढविणे, घरात व गल्लीत शैक्षणिक वातावरण निर्मिती करणे, मुले अभ्यास करत असतील तर त्यांना घरातील कामे न देणे, मुले अभ्यासाला बसण्याच्या वेळी टीव्ही – मोबाईलचा वापर बंद करणे, मुलांच्या गृहपाठ वह्या बघून शिक्षकांनी दिलेला अभ्यास त्यांनी केला आहे की नाही हे बघणे, शिक्षक कोणता घटक शिकवित आहेत आणि त्याचा अभ्यास घरी कसा घ्यावा यांवर शिक्षकांशी चर्चा करून तसे नियोजन करणे, घरात आनंदायी वातावरण ठेवणे यावर महिलांनी लक्ष द्यावे असे त्यांना सांगण्यात आले. घरातील काम करत असतानादेखील मुलांना गणिताच्या संकल्पनाची व प्रक्रियांची ओळख कशी करून देता येईल याविषयी त्यांना सांगितले. संबंधित शाळेचे शिक्षक व ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी अशा स्वरूपाचे सतत मार्गदर्शन करून महिलांची क्षमता बांधणी केली. आता या माता पालक या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी करताना दिसतात. त्याचबरोबर पालक सभेत शिक्षकांनी पालकांसमवेत मूलनिहाय चर्चा करायला सुरूवात केली. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा मांडणे, पालकांना शिक्षकांनी तयार केलेल्या विद्यार्थी संचयिका दाखविणे, मुलांनी काढलेले चित्र, कविता, गोष्टी, गाणे व विविध शैक्षणिक साहित्य फाइल्सच्या माध्यमातून महिला पालकांसमोर मांडणे आणि त्यातून त्यांना विश्वासात घेणे ही प्रक्रिया सातत्याने घडू लागली. पालक म्हणून महिला आपल्या मुलांच्या प्रगतीविषयी आणि त्यांच्यातील सुधारणांविषयी शिक्षकांशी बोलू लागल्या. सुरुवातीस शाळेच्या आवारात सुद्धा न येणाऱ्या महिला आज पालक सभांच्या बैठकांमध्ये मोठ्या प्रमाणात सक्रीय भाग घेऊ लागल्या आहेत. तसेच शाळेमध्ये महापुरुष जयंती, विशेष दिन आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येदेखील महिला पुढाकार घेताना दिसतात.





मध्यंतरी कोविड काळात मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून काही महिलांनी शिक्षकांच्या व ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या प्रतिनिधीच्या सहकार्याने गल्लीनिहाय अभ्यासगट सुरु केले. एका अभ्यासगटामध्ये कमीत कमी ५ विद्यार्थी आहेत. विद्यार्थी आपल्या समवयस्क मित्रांबरोबर अभ्यास करू लागल्याने 'Peer Learning' किंवा 'सहयोगी शिक्षण' प्रभावीपणे दिसून येऊ लागले. यातून या स्त्रियांचा आत्मविश्वास वाढला. सध्या गावामध्ये ५ अभ्यासगट कायमस्वरूपी चालू असतात. तिथे मुलांना एकत्र बसण्यासाठी जागा उपलब्ध करणे, रात्री प्रकाशाची सोय करणे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे अशा जबाबदाऱ्या महिला नियमितपणे पार पाडतात.

शाळेमधल्या भौतिक सुविधांमध्ये व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत घडून आलेल्या प्रगतीचे टप्पे स्वतः अनुभवलेल्या माता पालक सौ. अश्विनी मासाळ म्हणतात, "मी जेव्हा लग्न करून रामहिंगणी गावात आले तेव्हा शाळेजवळून जाता- येता शाळेची दुरावस्था पाहून माझ्या आपली मुले या शाळेत कधीच पाठवायची नाहीत असे मला वाटे. आता मात्र शाळेची प्रगती पाहून माझे हे विचार पूर्णपणे बदलून गेले आहेत. शाळा सरकारची नसून आपल्या गावाची आहे हे आम्हां सर्व महिलांना पक्के समजून आले आहे. शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, गावकरी व पालक हे सर्व एकजुटीने शाळेच्या विकासासाठी प्रयत्न करत आहेत."

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीता ग्रंथात **'ग्रामोन्न्तीचा पाया शिक्षण'** आहे असा उल्लेख आढळतो. यामधून गावाच्या विकासात असलेले शिक्षणाचे स्थान व महत्त्व स्पष्ट होते. **गावाच्या विकासाचा मार्ग शाळेतून जातो.** रामहिंगणी गावातील महिलांना हे उत्तम समजले आहे. ही संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी त्या पुढाकार घेताना दिसत आहेत.

The Collaborators for Transforming Education
EdelGive Foundation

दिनांक: मे २०२३
©: ग्यान प्रकाश फाउंडेशन
2016 पासून एडेलगिव्ह फाऊंडेशनद्वारे अर्थसहाय्यित, महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या कोलॅबोरेटर्स फॉर ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन (CTE) प्रोग्राममध्ये शिकलेल्या गोष्टींवर आधारित आहे.